**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०३ ची साक्ष**

**मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,**

माझे नाव – सुभाष श्रीधर शिवगण
वय – ५१ वर्षे. पोहेकॉ ४८१
व्यवसाय – नोकरी
रा/ने – कणकवली पोलीस ठाणे.

**सरतपास अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी अभियोगत्ता श्रीमती यु.आर.जाधव यांचेमार्फत शपथेवर सरू**

१. दि. ०४/०३/२०२१ रोजी माझी नेमणूक पोहेकॉ म्हणून मालवण पोलीस स्टेशन अंतर्गत देवबाग बीट अंमलदार म्हणून नेमणूक होती. सदर दिवसी माझ्याकडे मालवण पोलीस स्टेशन गुन्हा क्र. ३८/२०२१ चे तपासकाम माझ्याकडे सोपविण्यात आले होते. मी घटनास्थळी जावून घटनास्थळ पंचनामा केला. साक्षीदारांचे तपास टिप्पण नोंदविले. आरोपीच्या ताब्यातून चोरीला गेलेला मोबाईल सॅमसंग कंपनीचा ए.७० सुमारे १८,०००/– किंमतीचा मोबाईल हस्तगत केला. अंगझडती पंचनामा मीच केला. मला दाखविण्यात आलेला अंगझडती पंचनामा तोच आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी व दोन पंचाच्या सहया आहेत. त्यास नि.क्र. पी३/पीडब्ल्यू३ देण्यात येते. त्यानंतर मी मुद्देमाल पावती फाडली. मला दाखविण्ता आलेली पावती तीच आहे. त्यावर माझी व पोलीस स्टेशनचा शिक्का आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास नि.क्र.पी४/पीडब्ल्यू३ देण्यात येते. तपासकाम पुर्ण झाल्यानंतर आरोपीविरुध्द सबळ पुरावा असल्याने त्याच्याविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

सरतपास पुर्ण.

**आरोपीतर्फे उलट तपास विधिज्ञ श्री. ए.एस.गावडे यांचेमार्फत**

२. हे म्हणणे खरे आहे की, मालवण मध्ये डिसेंबर ते मे हा पर्यटनाचा हंगाम आहे. हे म्हणणे खरे आहे की, या कालावधीमध्ये एमटीडीसीमध्ये पर्यटकांची ये जा

असते. हे म्हणणे खरे आहे की, सदर प्रकरणातील पंच नामे विरेश रामचंद्र नाईक हा एमटीडीमध्ये सुरक्षा रक्षक म्हणून काम करतो. हे म्हणणे खरे आहे की, अंगझडती पंचनाम्यातील एक पंच मालवण गावचे पोलीस पाटील व दुसरे पंच कुंभारमाठचे पोलीस पाटील आहेत. हे मला माहित नाही की, सदर दोन्ही पंचाना मालवण पोलीस ठाण्याच्या केसीसमध्ये पंच म्हणून काम केलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, एमटीडीसी मालवण येथे सीसीटीव्ही कॅमेरे आहेत.

प्रश्न – तुम्ही एमटीडीसीमध्ये असलेले सीसीटीव्हीची पाहणी करुन तसा अहवाल दोषारोपपत्रासोबत दाखल केलेला नाही ?

उत्तर – सीसीटीव्ही पाहिले होते. परंतु त्याचा अहवाल दाखल केलेला नाही.

३. हे म्हणणे खरे आहे की, मी साक्षीदारांच्या नोंदविलेल्या तपास टिपणामध्ये एकाही साक्षीदाराने सांगितले नाही की, त्यांनी आरोपीला मोबाईलची चोरी करताना पाहिले होते. हे म्हणणे खरे आहे की, एमटीडीसीमध्ये स्टाफसोडून स्वतंत्र पंच सहज उपलब्ध झाले असते. हे म्हणणे खरे नाही की, माझे तपासामध्ये आरोपीने गुन्हा केला असे निष्पन्न झालेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीच्या ताब्यातून कोणताही मुद्देमाल हस्तगत केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीच्या विरुध्द खोटे तपासकाम करुन त्याचेविरुध्द खोटे दोषारोपपत्र दाखल केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास पुर्ण.

फेर तपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

एम.के.फकीह

दि. ०७–०३–२०२६ न्यायदंडाधिकारी वर्ग – १ मालवण.